||श्री राम समर्थ||
||श्री नागनाथ प्रसन्न||
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
**श्री शारदा रोपवाटिका**
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**विकास वॉटरप्रुफिंग**
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २१८ वा | सोमवार, दि. ०६ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# राज्यात अवकाळीचा कहर :

## २ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान; २९ जिल्ह्यांतील शेतकरी संकटात

**मुंबई (कटूसत्य वृत्त) :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेती क्षेत्राला मोठा फटका बसला असून तब्बल २ लाख ४ हजार ८३५ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याची धक्कादायक माहिती कृषी विभागाने दिली आहे. या आपत्तीत राज्यातील २९ जिल्ह्यांतील शेतकरी बाधित झाले असून खरीपानंतर उभ्या असलेल्या रब्बी व बागायती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

नाशिक, धुळे, अहिल्यानगर आणि जळगाव हे जिल्हे सर्वाधिक प्रभावित ठरले असून या भागात गारपिटीसह झालेल्या पावसामुळे पिके अक्षरशः जमीनदोस्त झाली आहेत. १४ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत झालेल्या या अवकाळीमुळे केळी, गहू, मका, हरभरा, आंबा, ज्वारी, टरबूज, कलिंगड, भाजीपाला, डाळिंब, कांदा, संत्रे आणि द्राक्षे या विविध पिकांना मोठा फटका बसला आहे. परिणामी आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले असून ते हवालदिल झाले आहेत.



दरम्यान, या पार्श्वभूमीवर राज्याचे आपत्ती व्यवस्थापन व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील बाधित भागांची पाहणी केली. चिंचोली व वडगाव पिंगळा या गावांमध्ये त्यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचा आढावा घेतला. चिंचोली येथे शेतकरी रमेश नागरे यांच्या कांदा पिकाची तसेच आनंदीबाई काशिनाथ कांगणे यांच्या बीट व कांदा पिकाची पाहणी करत त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला व परिस्थितीची माहिती घेतली.

राज्य सरकारकडून पंचनामे सुरू असून लवकरच मदतीची घोषणा होईल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. मात्र नुकसानाचा आकडा प्रचंड असल्याने तातडीने आर्थिक मदत व कर्जमाफीसारखे ठोस निर्णय घेण्याची मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे.

### शेतकऱ्यांसमोरील आव्हाने वाढली

अवकाळी पावसामुळे फळबागा व भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून बाजारात मालाची आवक घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे महागाई वाढण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, कर्जबाजारी शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे.

शासनाने तातडीने मदत जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

### जिल्हानिहाय नुकसान (१४ मार्च ते ३१ मार्च)

नाशिक : ३०,४४८ हेक्टर
अहिल्यानगर : २३,६३३ हेक्टर
जळगाव : २२,३६१ हेक्टर
धुळे : १४,८३२ हेक्टर
बुलढाणा : ८,५०७ हेक्टर
छत्रपती संभाजीनगर : ८,४४५ हेक्टर
सोलापूर : २,४३९ हेक्टर
पुणे : १,७८५ हेक्टर
जालना : १,६९२ हेक्टर
धाराशीव : १,४०७ हेक्टर
अकोला : ९३१ हेक्टर
अमरावती : ६९६ हेक्टर
नांदेड : ५०२ हेक्टर
एकूण (२९ जिल्हे) : १,२२,९९७ हेक्टर


**सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!**
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949



**आरोग्यविषयक**
**मुळव्याध आहे?**
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
**संपर्क :**
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450


# सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये पाच दिवसीय 'IDE बूटकॅम्प'चे आयोजन

### राष्ट्रीय पातळीवर 'नोडल सेंटर' म्हणून सिंहगड इन्स्टिट्यूटची निवड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव (सोलापूर) येथे दि. ६ ते १० एप्रिल २०२६ या कालावधीत इनोव्हेशन, डिझाईन अँड एंटरप्रेन्योरशिप (IDE) बूटकॅम्प 2026 चे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

हा प्रतिष्ठित बूटकॅम्प अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) व केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल (MIC) यांच्या पुढाकारातून आयोजित केला जात असून, वाधवानी फाउंडेशन (ज्ञान भागीदार) व रइक फाउंडेशन (संस्थात्मक भागीदार) यांचे सहकार्य लाभले आहे. विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम, डिझाईन थिंकिंग व उद्योजकीय कौशल्यांचा विकास करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या बूटकॅम्पसाठी एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाची राष्ट्रीय पातळीवर 'नोडल सेंटर' म्हणून निवड करण्यात आली असून, ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे. या निवडीमुळे संस्थेच्या नवोपक्रम क्षेत्रातील कायार्ची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेल्याचे अधोरेखित होते.

देशभरातील ३० ठिकाणी तीन टप्प्यांत हा बूटकॅम्प आयोजित करण्यात येत असून, त्यात पहिला टप्पा ६ ते १० एप्रिल (१३ ठिकाणे), दुसरा टप्पा २० ते २४ एप्रिल (१३ ठिकाणे) आणि तिसरा टप्पा ११ ते १५ मे (४ ठिकाणे) या कालावधीत पार पडणार आहे. एकूण सुमारे ६,५०० विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित असून, त्यात स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (SIH) मधील सहभागी व विजेते, इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल (IIC) संस्थांचे विद्यार्थी तसेच नवकल्पनात्मक आयडिया किंवा प्रोटोटाइप असलेले विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

सोलापूर येथील या नोडल सेंटरमध्ये सुमारे २५० विद्यार्थी सहभागी होणार असून, विविध क्षेत्रातील नवोपक्रमक, उद्योजकतेकडे वाटचाल करणारे विद्यार्थी व तज्ज्ञ यांचा सहभाग राहणार आहे. विद्यार्थ्यांसोबत प्राध्यापक मार्गदर्शकही उपस्थित राहून त्यांना मार्गदर्शन करतील.

या वर्षी जम्मू-काश्मीर, ईशान्य भारत तसेच टियर-२ व टियर-३ शहरांमध्ये बूटकॅम्पचे आयोजन केले जात आहे. बूटकॅम्पचे उद्घाटन ६ एप्रिल रोजी अकउळए मुख्यालय, नवी दिल्ली येथून प्रा. योगेश सिंह (अध्यक्ष, AICTE) यांच्या हस्ते, सदस्य सचिव डॉ. श्यामा राठ यांच्या उपस्थितीत आभासी माध्यमातून होणार आहे. तसेच सोलापुरात स्थानिक स्तरावर लक्ष्मी हायड्रॉलिक्स कंपनीचे चेअरमन निरंजन सिंघवी व सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या बूटकॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समस्यांवर आधारित कार्यशाळा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, स्टार्टअप संस्थापकांचे सत्र आणि टीमवर्कच्या माध्यमातून नवकल्पनात्मक दृष्टिकोन विकसित करण्याची संधी मिळणार आहे.

याशिवाय चौथ्या दिवशी स्थानिक इनोव्हेशन इकोसिस्टम व सांस्कृतिक स्थळांना भेट देण्यात येणार असून, पाचव्या दिवशी अनुदान, फंडिंग संधी व बौद्धिक संपदा हक्क (IPR) यावर विशेष सत्र आयोजित करण्यात येणार आहे. अंतिम दिवशी पिचिंग सत्र होऊन प्रत्येक ठिकाणी सर्वोत्तम ५ संघांना प्रमाणपत्रे व सन्मानचिन्हे प्रदान करण्यात येतील.

पहिल्या दोन आवृत्त्यांमध्ये देशभरातील ४६ ठिकाणी १०,००० हून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून अनेकांनी स्टार्टअप सुरू करून विविध क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण कामगिरी केली आहे.

या उपक्रमामुळे सहभागी विद्यार्थ्यांना वास्तव जीवनातील समस्यांवर अभिनव उपाय विकसित करण्याची संधी मिळणार असून, भारतातील नवोन्मेष परिसंस्थेला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

यावेळी कार्यक्रम समन्वयक प्रा. सुनिल शाखापुरे, डॉ. मुदस्सर नाईकवाडी, प्रबंधक डॉ. डी. आय. नवले आणि जनसंपर्क अधिकारी रामकृष्ण लांबतुरे उपस्थित होते.

**बूटकॅम्प दरम्यान प्रमुख उपक्रम :**

- नामांकित तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर सत्र
- नवोपक्रम व डिझाईन थिंकिंगवरील प्रत्यक्ष कार्यशाळा
- आयडिया जनरेशन व समस्या सोडविण्याच्या कृती
- स्टार्टअप संकल्पनांसाठी मेंटरिंग सत्र
- इन्क्युबेशन सेंटर भेट व स्टार्टअप्सशी संवाद
- आयडिया पिचिंग व मूल्यांकन प्रक्रिया

# शंकर बटगिरी यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलकंठेश्वर सोशल फाउंडेशनचे सल्लागार शंकर (अण्णा) नारायण बटगिरी यांच्या वाढदिवसानिमित्त महात्मा बसवेश्वर मेडिकल फाऊंडेशन व न्यू लाईफ मेडिको सर्व्हिसेस यांच्या संयुक्त विद्यमाने राजेंद्र चौक येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.




या शिबिराचे उद्घाटन डॉ. प्रकाश घटोळे यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नीलकंठेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजीव आडकी, माजी विश्वस्त व संचालक श्रीनिवास बंदगी, प्रेसिडेंट सुनिल धुळम, अंबादास नादरगी, बालमणी कस्सा, लक्ष्मीकांत आडकी, प्रशांत आरकेल, लखन मिठ्ठा, प्रशांत दंडगळ, विद्या सिंगम तसेच समाजातील अनेक बांधव उपस्थित होते.

या शिबिरात एकूण ५२ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी १२ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. उपस्थित सर्व रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी शंकर (अण्णा) बटगिरी यांनी उपस्थित मान्यवर, वैद्यकीय पथक व नागरिकांचे आभार मानले.


शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465



VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007







# जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी सोलापूर जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला



सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून नवीन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी आज दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयात पदभार स्वीकारला.

यावेळी अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, प्रांत अधिकारी सुमित शिंदे, तहसीलदार निलेश पाटील, पंढरपूर चे तहसिलदार सचिन लंगुटे यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

राज्य शासनाच्या 2 एप्रिल 2026 रोजीच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची बदली नागपूरचे जिल्हाधिकारी म्हणून करण्यात आली तर सोलापूरचे जिल्हाधिकारी म्हणून कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांची नियुक्ती झाली आहे.

## संपादकीय

# युद्धखोर ट्रम्प यांना 'घरचा आहेर'

वॉशिंग्टन डीसी ही प्रशासकीय राजधानी, पण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा बराचसा कारभार फ्लोरिडातील त्यांच्या 'मार-ए-लेगो' येथील आलिशान इस्टेटीतून चालतो, कारण ट्रम्प बहुतेक काळ तेथेच असतात.

भरपूर वेळ गोल्फचा आस्वाद नि फावल्या वेळेत अध्यक्षीय कामे अशी चैन वॉशिंग्टनमध्ये साधत नाही. सध्या इराणवर बॉम्बवर्षाव आणि शस्त्रसंधीचे दावे ही निकडीची कामे आलटूनपालटून करावी लागत असल्यामुळे इस्टेटीवर जाणे-येणे कमी झाले असावे. त्यामुळेच फ्लोरिडाच्या कायदेमंडळातील एका छोट्या पण महत्त्वाच्या निवडणुकीकडे दुर्लक्षही झाले असावे. त्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाच्या एमिली ग्रेगरी विजयी झाल्या. ट्रम्प यांच्या परसदारातील आणि रिपब्लिकन प्रभाव असलेल्या फ्लोरिडासारख्या राज्यातील हा विजय प्रस्तुत काळात विशेष लक्षवेधी ठरतो. या ग्रेगरी पहिल्यांदाच निवडणूक लढवत होत्या. त्यांचे नाव बहुतांना माहीत असण्याची शक्यता शून्य. तसे पाहता फ्लोरिडाच्या कायदेमंडळातली ही स्थानिक निवडणूकच. पण अमेरिका जिंकून जग जिंकायला निघालेल्या ट्रम्प यांना घरातली जागा राखता आली नाही म्हणून तिचे प्रतीकात्मक महत्त्व अधिक. शिवाय हे एकल उदाहरण नाही. यासाठी ट्रम्प यांचे सातत्याने घटणारे पसंतीमूल्य आणि ते अध्यक्ष बनल्यापासून अमेरिकेत झालेल्या विविध निवडणुका यांचा धांडोळा आवश्यक ठरते.

कारण गतवर्षी बहुतेक देशांविरुद्ध अवाजवी आयातशुल्काचे (टॅरिफ) अशास्त्रीय हत्यार वापरून ट्रम्प यांनी अमेरिकेचे वर्चस्व दाखवून देण्याचा हास्यास्पद प्रयत्न करून पाहिला. यांतील काही टॅरिफ निर्णय सौम्य तर काही स्थगित करावे लागले, मोजकेच अस्तित्वात राहिले. या टॅरिफशाहीने सर्वाधिक नुकसान अमेरिकनांचे झाले. कारण दैनंदिन वस्तू, भाजीपाला, मांस महाग झाले. अमेरिकनांना प्राधान्य देण्यासाठी हे धोरण राबवण्याचा खटाटोप ट्रम्प प्रशासनाच्या अंगाशी आला. भारत, चीन, युरोपीय समुदाय, कॅनडा, ब्राझील, ब्रिटन, जपान, कोरिया अशा मोठ्या अर्थव्यवस्थांशी बोलणी सुरू आहेत किंवा स्थगित आहेत. यांतील अनेक देशांतून अमेरिकेला वस्तुमालाचा पुरवठा होत असतो. त्याचा थेट परिणाम विशेषतः गतवर्षी झालेल्या प्रांतिक आणि स्थानिक निवडणुकांच्या निकालावर झालेला दिसून येतो. फेब्रुवारी अखेरीस इस्रायलच्या कच्छपी लागून इराणवर सुरू केलेल्या कारवाईच्या झळा अमेरिकेलाही बसू लागल्या आहेत. हा देश मुळात चालतो, धावतो, उडतो जीवाश्म इंधनांवर. चढ्या इंधनदरांचे चटके त्यालाही बसत आहेत. फ्लोरिडातील ताजी निवडणूक रिपब्लिकनांविरुद्ध फिरण्यामागे हेही कारण आहे.

टॅरिफ आणि इराण या दोन घटकांव्यतिरिक्त इतरही कारणांमुळे ट्रम्प यांच्याविरुद्ध असंतोष वाढत आहे. अमेरिकेत मोठ्या प्रमाणात सरकारी नोकरकपात करण्यात आली. आरोग्यसेवा सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आहे. बेकायदा स्थलांतरितांना हुसकावण्याच्या नावाखाली शहरांमध्ये केंद्रीय (फेडरल) पथकांची गस्त सुरू आहे. त्यांच्याविरुद्ध आंदोलने करणार्‍यांवर गोळ्या झाडण्यात येतात. आतापर्यंत दोन गौर्‍या अमेरिकनांचा यात मृत्यू झाला. डेमोक्रॅटशासित राज्यातील प्रशासन आणि पोलीस दलावर अविश्वास दाखवून तेथे केंद्रीय निमलष्करी दले धाडण्यात येत आहेत. अशा बाबींमुळे ट्रम्प यांचे पसंतीमूल्य गेल्या महिन्यात ४० टक्क्यांच्या खाली घसरले. कोणत्याही अध्यक्षाच्या कार्यकाळाच्या दुसर्‍या वर्षातील ही नीचांकी घसरण. ते दुसर्‍यांदा निवडून आले त्यानंतरच्या काळात ३० ठिकाणी झालेल्या निवडणुकांमध्ये डेमोक्रॅट्सनी रिपब्लिकनांच्या जागा खेचून आणल्या. रिपब्लिकन पक्षाला अशी करामत अजून एकदाही जमलेली नाही. फ्लोरिडा राज्याचेच उदाहरण यासंदर्भात महत्त्वाचे ठरते. तेथील दोन शहरांमध्ये (बोका रेटन आणि मायामी) गेल्या वर्षाच्या अखेरच्या टप्प्यात झालेल्या महापौर निवडणुकांमध्ये अनुक्रमे ३० आणि ४५ वर्षांनी डेमोक्रॅट पक्षाचे उमेदवार विजयी झाले.

इराण कारवाई लांबत असून परिस्थिती चिघळत आहे. याचा नकारात्मक फायदा नोव्हेंबरमध्ये येणार्‍या मध्यावधी निवडणुकांमध्ये होऊ शकतो याची खात्री डेमोक्रॅटिक नेतृत्वाला वाटते. या निवडणुकांत सेनेट आणि प्रतिनिधिगृह या अमेरिकी काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांतील सध्याचे बहुमत रिपब्लिकन पक्ष गमावू शकतो. हे घडल्यास ट्रम्प यांच्या चाळ्यांना काँग्रेसचे अधिष्ठानही राहणार नाही. त्यामुळे ट्रम्प अधीर बनले आहेत, तर डेमोक्रॅट्स आशावादी. ट्रम्प यांना ताज्या निवडणुकीत मिळालेला घरचा आहेर हेच दर्शवतो.

# युद्ध थांबवा, लोक वाचवा!

अमेरिका आणि इस्रायल यांनी इराणवर हल्ला करून युद्ध सुरू होऊन ३३ दिवस पूर्ण झाले आहेत. या एक महिन्याहून अधिक कालावधीत सुमारे २००० लोकांचा जीव गेला आहे, तर आर्थिक हानी अगणित झाली आहे. इराणचे सर्वोच्च नेतेही या युद्धात मारले गेले आहेत. जगावर आता तिसऱ्या महायुद्धाचे संकट घोंगावत आहे. ऊर्जा संकटामुळे पाकिस्तानसह अनेक देशांमध्ये लॉकडाऊनसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेतन्याहू यांचा इराणला संपवण्याचा हेतू अत्यंत हिंसक आहे. युद्धामध्ये सामान्य लोक किड्या-मुंग्यांप्रमाणे मारले जातात. युद्धाची सर्वाधिक झळ लहान मुले आणि स्त्रियांना सहन करावी लागते. लहान मुलांच्या मनावर आणि भावनांवर युद्धकाळात विपरीत परिणाम होतो. त्यांचे शिक्षण अर्धवट राहते. सतत भीतीच्या सावटाखाली राहिल्यामुळे मुले आपल्या क्षमतांचा विकास करू शकत नाहीत. लांबलेल्या युद्धामुळे अख्खी एक पिढी उद्ध्वस्त होऊ शकते. युद्धकाळात स्त्रियांवरील हिंसाचाराच्या घटनाही वाढतात. अन्नटंचाईमुळे भूकबळींची संख्या वाढते.

युद्धामध्ये कधी कोणती परिस्थिती निर्माण होईल, हे सांगता येत नाही. मानवी जीवनच नव्हे, तर संपूर्ण जीवसृष्टीच अनिश्चिततेच्या उंबरठ्यावर येऊन उभी राहते. एकाने गाय मारली तर दुसरा वासरू मारतो, अशी सूडाची साखळी निर्माण होते. बदल्याच्या आगीत लाखो निष्पाप जीव होरपळून निघतात.

खरं तर कोणत्याही युद्धामागील कारणे शोधून पाहिल्यास, लोकांचे हित, सुरक्षा, स्वातंत्र्य आणि सुखी जीवन यांचा केवळ आभास निर्माण केला जातो. मार्क्सवादी सिद्धांतानुसार, वस्तुनिष्ठ भौतिक स्वारस्यामुळे लोक नेहमी प्रोत्साहित होतात आणि आणि ही स्वारस्य लपवण्यासाठी आणि विरोधकांना गोंधळात टाकण्याकरता केवळ कथांचा वापर केला जातो. आजपर्यंतची अनेक युद्धे धार्मिक, राष्ट्रवादि किंवा उदारमतवादी आदर्शांसाठी नव्हे, तर सत्ताधारी अभिजनांच्या आर्थिक स्वारस्यांकरता लढली गेली आहेत. ही युद्धे समजून घेणे म्हणजे देव, राष्ट्रभक्ती किंवा लोकशाही याबद्दलची पुराणकालीन वाळकी पान बाजूला सारणं आणि नग्नपणे सत्ता संबंधांचे निरीक्षण करणे होय. " इराणविरोधातील अमेरिका-इस्रायल युद्धाचा नेमका उद्देश काय आहे, हे तपासणे आजच्या घडीला आवश्यक आहे.

इराणविरोधात युद्ध सुरू झाल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात युद्ध संपवण्याचे आश्वासन दिले असले, तरी त्यांनी नजीकच्या काळात मोठे हल्ले करण्याची धमकीही दिली आहे. इराणला 'अश्मयुगात नेऊ' अशी भाषा त्यांनी वापरली आहे. आता ते इराणमधील वीज निर्मिती प्रकल्प, जलशुद्धीकरण यंत्रणा आणि खारे पाणी गोडे करणारे प्रकल्प उद्ध्वस्त करण्याची धमकी देत आहेत. कोणत्याही युद्धात नागरी जीवनावर हल्ला करणे, निरपराध लोकांचे जीव घेणे, हा मानवतेवर हल्ला मानला जातो आणि अशा कृत्यांना युद्धगुन्हा ठरवले जाते. आज अमेरिकेतील नागरिकदेखील रस्त्यावर उतरून 'नो किंग्स' आंदोलनात सहभागी होत आहेत. ही निदर्शने मानवतेच्या बाजूने उभी आहेत. निष्पाप लोकांचे जीवन अमूल्य आहे, हे सांगणारी ही चळवळ आहे. संवेदनशील लोक आपल्या देशातील सत्तेविरोधातही आवाज उठवत आहेत, ही बाब विशेष महत्त्वाची आहे.

जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार खनिज तेल, पेट्रोल आणि डिझेल आहे. त्याचबरोबर घरगुती वापरासह विविध उद्योगांमध्ये गॅसचा वापर वाढला आहे. हे युद्ध लांबले, तर अविकसित आणि विकसनशील देशांमध्ये बेरोजगारी वाढेल. परिणामी या देशांमध्ये सुद्धा अराजकता निर्माण होईल. आधुनिक औषधनिर्मितीत पेट्रोकेमिकल्सचा मोठा वापर होतो. त्यामुळे या युद्धाचा औषध उत्पादनावरही विपरीत परिणाम होऊन जगभरातील देशातील अनेक रुग्णांना औषधाअभावी जीव गमवावा लागेल.

शेती उत्पादन वाढवण्यासाठी खतांची गरज असते. ही खते तयार करण्यासाठी लागणारे नायट्रोजन आणि फॉस्फेट मोठ्या प्रमाणावर आयात करावे लागतात. युद्धामुळे आयातीवर परिणाम होऊन खतांचा तुटवडा निर्माण होईल आणि शेती उत्पादन घटेल. परिणामी अन्नधान्याची टंचाई निर्माण होऊन भूकबळी वाढण्याची शक्यता आहे. एकूणच, 'युद्ध थांबवा आणि लोक वाचवा!' ही मोहीम आता जगभरातील सामान्य लोकांनी आपल्या हातात घ्यावी, हीच काळाची गरज आहे.



- **किशोर जाधव**, सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# शिवरायांच्या पुतळ्याचे शांततेत स्थलांतर

## अंजनगावातील तणाव निवळला



**माढा (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावरून चार दिवसांपासून उद्‌भवलेला तणाव शनिवारी (ता. ४) दुपारी शांत झाला. येथील खेलोबा मंदिर परिसरात मंगळवार (दि. ३१) पहाटे अचानक छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा बसविण्यात आला होता.

मंदिराच्या जागेत हा पुतळा बसवून गावात तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप करण्यात आला.

पुतळ्याचे स्थलांतर करण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीस विरोध दर्शविला गेल्याने चार दिवसांपासून तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र शुक्रवारी सायंकाळी उशिरा प्रशासनाच्या शिष्टाईला यश आले अन वाद निवळला. शनिवारी (ता. ४) दुपारी तीनच्या सुमारास पुतळ्याचे स्थलांतर करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे स्थलांतर केल्यानंतर कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी अंजनगाव येथे भेट दिली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, शांतता भंग करणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. परिसरात शांततेचा भंग करणे, पोलिसांवर व अधिकाऱ्यांवर दगडफेक करणे, सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे, विनापरवाना आंदोलन करणे या विरोधात सहा गुन्हे दाखल झाले आहेत.

हाती आलेल्या पुराव्यानुसार हे गुन्हे दाखल झाले असून विविध ठिकाणचे फुटेज तपासून अजून नव्याने गुन्हे दाखल होणार आहेत. विशेषतः बाहेरून येणाऱ्या लोकांनी फूस लावून शांतता भंगाचा प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले. शांतता भंग करणाऱ्यांना आर्थिक रसद पुरविणाऱ्या विरोधातही कडक कारवाईचे संकेत त्यांनी दिले. प्रसारमाध्यमांनीही अतिरंजीतपणा टाळून विधायक कामाला प्रोत्साहन देण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांच्या समवेत आमदार अभिजित पाटील उपस्थित होते.

चार दिवसांच्या तणावपूर्ण परिस्थितीत काल सायंकाळी उशिरा मोहोळ येथे कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी ग्रामस्थासमवेत बैठक झाली. त्यानंतर विश्रामगृहात पालकमंत्री जयकुमार गोरे, विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, सोलापूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार राजन पाटील, प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, तहसीलदार संजय भोसले, गुन्हे अन्वेषणचे संजय जगताप यांनी गावातील दोन्ही गटांशी चर्चा केली.

**दोन्ही गटांना प्रस्ताव मान्य**

बैठकीत प्रशासनाने मांडलेला पुतळा स्थलांतराचा प्रस्ताव दोन्ही गटांनी मान्य केला. पोलिस प्रशासनाने आज सकाळपासूनच तगडा बंदोबस्त ठेवला होता. मोहोळ माढा मार्ग बंद ठेवून अंजनगाव येथे बाहेरून येणारी गर्दी थांबविण्यात आली. क्रेन व जेसीबीच्या साहाय्याने पुतळ्याचे स्थलांतर करण्यात आले.

# प्रा. मित्रगोत्री व भोसले यांचे कार्य सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखे - सपाटे

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** प्रा.डॉ.अरुण मित्रगोत्री व ग्रंथालय परिचर दत्ता भोसले यांनी आपल्या सेवाकाळात संस्थेने सुवर्ण अक्षरांनी लिहावे, असे कार्य केल्याचे मत मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी व्यक्त केले.

मराठा समाज सेवा मंडळ संचलित छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजमधील प्रा. डॉ. अरुण मित्रगोत्री व ग्रंथालय परिचर दत्ता भोसले यांचा निवृत्तीनिमित्त संस्थेच्यावतीने सपाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे सरचिटणीस प्रा. महेश माने, खजिनदार महादेव गवळी, संचालक विनायक पाटील, सुरेश पवार , मुकुंद जाधव, मंगेश जाधव, अशोक चव्हाण, अलका सुरवसे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. नितीन मोटे यांनी केले.

यावेळी तुळजाभवानी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. यशवंत डोके, ज्येष्ठ पत्रकार अविनाश कुलकर्णी, छत्रपती शिवाजी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, माजी प्राचार्य डॉ.मधुकर पवार, डॉ. अरुण सोनकांबळे, प्रा. डॉ. नागेश गायकवाड, प्रा. डॉ. राणी मोटे, प्रा. सचिन चव्हाण, माजी विद्यार्थी हरिभाऊ कांबळे आदींनी मनोगत व्यक्त करून प्रा. डॉ .मित्रगोत्री व भोसले यांच्या कार्याचा गुणगौरव केला.तर सत्कारमूर्ती प्रा. डॉ. मित्रगोत्री व भोसले यांनीही मनोगत व्यक्त करून संस्थेप्रतीची आपली कृतज्ञता व्यक्त केली. तसेच मित्रगोत्री यांनी यावेळी संस्थेला सात लाख रुपयांची देणगी दिली.या कार्यक्रमास प्राचार्या मंजुश्री पाटील, उषा गोकुळे, किशोर बनसोडे, नागनाथ नवगिरे, ज्योतिषशास्त्री बाळासाहेब ओहोळ, पत्रकार नंदकुमार येच्चे, जयजित पटवा, दादा सुरवसे, बाई भोसले, सुरेखा मित्रगोत्री, बाबूराव व्यवहारे, बाबूराव डोंगरे, अरविंद येळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. युवराज सुरवसे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. वाल्मिकी कीर्तिकर यांनी मानले.

# श्री क्षेत्र वाशिंबे येथील भैरवनाथ यात्रोत्सवात 'चागंभलं' घ्या घोषणा अन गुलालाची उधळण

**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** 'भैरवनाथचं चांगभलं' या जयघोषाने वाशिंबे नगरी दुमदुमली. गुलालाची उधळण करत भाविकांनी उत्साह शिगेला पोहोचवला. ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात भक्तीचा जल्लोष पाहायला मिळाला.

देवाच्या घोड्यावरील छबिन्याच्या मिरवणुकीत भाविक भक्तांची अलोट गर्दी होती. 'नाथ साहेबांचं चांगभलं' अशा जयघोषात संपूर्ण वाशिंबे नगरी भक्तिमय झाली. गुलाल उधळण्याच्या वर्षावाने भाविकांनी भैरवनाथ महाराज व जोगेश्वरी आईसाहेबचा मानाने सन्मान केला.परंपरेनुसार पालखी सोहळा, विवाह सोहळा, कावडी



नृत्य , छबिना पालखी आणि इतर धार्मिक विधी मोठ्या उत्साहाने पार पडले.मंदिरावरती सुंदर फुलांनी सजावट करण्यात आली होती. फटाक्यांचा अतीषबाजीने व विद्युत रोषणाईने मंदिर परिसरात उजळून गेला होता.

वाशिंबे हे करमाळा तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून, भैरवनाथ देवस्थान हे गावाचे संरक्षक दैवत मानले जाते. दरवर्षी यात्रा उत्सवात परिसरातील हजारो भाविक सहभागी होतात. यावर्षीही उत्सवात भक्तीभाव, एकता आणि आनंदाचे दर्शन घडले.

या उत्सवानिमित्त भैरवनाथ मंदिर परिसरात भव्य निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान आयोजित केले होते.अनेक नामवंत महाराष्ट्र चॅम्पियन मल्ल यांनी सहभाग नोंदविला. सर्वधर्म समभावाचे प्रतिक असणाऱ्या या यात्रेत विविध समाजातील लोकांचा मान आसतो. ही यात्रा पारंपरिक पद्धतीने साजरी होते..युकवांचा उत्साह शिगेला पोहोचला होता.

हाजारो भाविकांनी 'भैरवनाथाच्या नावानं चांगभलं' असे म्हणत देवाच्या चरणी मनोभावे प्रार्थना केली. ही यात्रा वर्षभराची ऊर्जा आणी साकारत्मता देते.या उत्सवाचे सर्व नियोजित कार्यक्रम भैरवनाथ मंदिर ट्रस्ट, बलुतेदार मंडळ, ग्रामस्थ यांनी योग्य नियोजनात पार पाडले.

# उपमुख्यमंत्री शिंदेंची आमदार पाटील यांच्याशी भेट

## माढ्यासाठी विविध विकासकामांना निधीची मागणी



**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्न आणि विकासकामांसाठी आमदार अभिजित पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईत भेट घेऊन निधीची मागणी केली.

या भेटीत आमदार पाटील यांनी मतदारसंघातील महत्त्वाच्या योजनांबाबत निवेदन सादर केले. माढा शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रलंबित पाणीपुरवठा योजनांना तातडीने मंजुरी देऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या कायार्चा गौरव पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी माढा शहरात भव्य शिवस्मारक उभारण्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा, अशीही मागणी करण्यात आली. श्रीपूर महाळुग नगरपंचायतीसाठी स्वतंत्र प्रशासकीय इमारत उभारण्यासाठी जागा खरेदी व बांधकामासाठी ५ कोटी रुपये देण्याची मागणीही करण्यात आली. याशिवाय माढ्यातील मनकर्णा नदी परिसराचे सुशोभीकरण व घाट बांधणीसाठी १० कोटी रुपये निधी देण्याची मागणी करण्यात आली. या प्रकल्पामुळे धार्मिक व पर्यटन विकासाला चालना मिळून परिसर अधिक स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. माढा नगरपंचायतीसाठी नवीन प्रशासकीय इमारत आणि सुसज्ज सांस्कृतिक सभागृह उभारण्यासाठी १० कोटी रुपयांची मागणीही यावेळी करण्यात आली. या सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन लवकरच निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याचे आमदार अभिजित पाटील यांनी सांगितले.

# दुचाकी वाहनांसाठी MH 45 BF नवीन मालिका सुरु

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची गर्दी होते व त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो. ब-याच वेळा नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने तो मिळावा, यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरुन हवे असतील त्यांनी दिनांक 6 एप्रिल 2026 ते 7 एप्रिल 2026 पासून सोबतच्या वेळापत्रकानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 या दरम्यान विहीत नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी (केवळ क्र 16 अन्वये जारी झालेले डी डी), पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वतः जमा करावा, सदर डीडी फक्त "Dy R.T.O. Akluj" यांच्या नावे नॅशनलाईज शेडयुल्ड बँकेचा असावा, या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील.

अर्जासोबत केंद्रिय मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 4 तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 5 अ मध्ये विहीत केलेल्या पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल (उदा. आधार कार्ड, टेलिफोन बील इ.) एकाच नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी दिनांक 8 एप्रिल 2026 रोजी सकाळी 11.00 वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. या यादीतील अर्जदारांना लिलावाकरिता जर जास्त रक्कमेचा डीडी जमा करावयाचा असेल त्यांनी सोबतच्या वेळापत्रकानुसार दर्शविलेल्या दिवशी (दि. 8 एप्रिल 2026 व 9 एप्रिल 2026 दुपारी 02.00 वा. पर्यंत) सीलबंद लिफाफ्यात कार्यालयात जमा करावा. लिलावासाठी सादर केलेला डीडी रुपये 300/- पेक्षा कमी रकमेचा नसावा. सदर डीडी फक्त "Dy R.T.O. Akluj" यांच्या नावे नॅशनलाईज शेडयुल्ड बँकेचा असावा, या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील डीडी कमीत कमी एक महिना मुदतीमध्ये असावा. दिनांक 9 एप्रिल 2026 रोजी दुपारी 03.00 वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अकलूज यांच्या उपस्थितीत पात्र व्यक्तीसमोर (संबंधित अर्जदार) लिफाफे उघडुन ज्या अर्जदाराने विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्यास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाईल.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून 180 दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करून वाहन क्रमांक प्राप्त करून घ्यावा अन्यथा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल, कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही., वाहन धारकाने एका वाहनासाठी एकापेक्षा जास्त आकर्षक नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी कार्यालयात डी.डी. जमा केल्यास सदर बाबीस कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**नविन दुचाकी मालिकेचे वेळापत्रक (MH 45 BF)**

- दिनांक 6 ते 7 एप्रिल 2026 रोजी तिप्पट शुल्कचे अर्ज व दुचाकी वाहनांसाठी नियमित अर्ज वेळ सकाळी 11 ते 3 या वेळेत स्विकारले जातील.
- दिनांक 8 एप्रिल 2026 रोजी सकाळी 11 वाजता यादी जाहीर.
- दिनांक 8 एप्रिल 2026 रोजी दुपारी 2 वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात लिलावासाठीचे डीडी स्वीकारले जातील. त्यासाठी रक्कम रुपये 300 पेक्षा जास्त रकमेचे डीडी जमा करणे गरजेचे.
- दिनांक 9 एप्रिल 2026 रोजी तिप्पट शुल्काच्या आलेल्या अर्जासाठी व दुचाकी वाहनांसाठी आलेल्या डबल अर्जाचा लिलाव दुपारी 03.00 वाजता.

## वात्रटिका

### बिनविरोला विरोध

निवडणूक म्हटलं की
पक्ष घेतात सुसाट गती...
कोणी थांबतो कोणी धावतो
कोणाला गाटायचे बारामती...
बिनविरोधला विरोध,आता
काही लपून राहिला नाही...
घरातून विसर पडला की
दुसऱ्याला दुखवटा वाटत नाही...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# पंढरपूर फलटण रेल्वे मार्ग प्रकल्प प्रशासकीय मंजुरीच्या टप्प्यातच अडकला



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्रातील लोणंद पंढरपूर नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पातील फलटण पंढरपूर (सुमारे १०९ कि.मी.) हा टप्पा अद्ययावत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) रेल्वे मंडळाकडे सादर करूनही अपूर्ण आहे का? असल्यास त्याचा तपशील काय? प्रकल्पाच्या अंतिम मंजुरीपूर्वी नीती आयोगाकडून काही निरीक्षणे/सूचना प्राप्त झाल्या आहेत का? असल्यास त्यावर सरकारने कोणती पावले उचलली आहेत?

खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी लेखी विचारलेल्या प्रश्नांना केंद्र सरकारच्या वतीने केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लेखी उत्तर दिले की,फलटण – पंढरपूर नवीन रेल्वे मार्ग (१०९ किमी) प्रकल्पाचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून DPR तयार करण्यात आला आहे. DPR तयार झाल्यानंतर प्रकल्पाला मंजुरी देण्यासाठी राज्य सरकारसह विविध संबंधित घटकांशी सल्लामसलत करावी लागते. तसेच नीती आयोग, अर्थ मंत्रालय इत्यादी संस्थांची मान्यता आवश्यक असते. संबंधित टप्प्याच्या मंजुरीत व काम सुरू करण्यात झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत? प्रकल्पाला गती देण्यासाठी, काम सुरू करण्यासाठी आणि निश्चित कालावधीत पूर्ण करण्यासाठी सरकारकडून कोणती ठोस पावले उचलली जात आहेत या खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय मंत्र्यांनी उत्तरात सांगितले प्रकल्पांना मंजुरी देण्याची प्रक्रिया ही सतत चालणारी आणि गतिमान असते. त्यामुळे विविध संस्थांकडून मिळणाऱ्या मंजुरी व परीक्षणांवर अंतिम कालमर्यादा अवलंबून असते. दरम्यान, फलटण – पंढरपूर रेल्वे मार्ग हा पंढरपूरसारख्या महत्त्वाच्या तीर्थक्षेत्राला जोडणारा आणि ग्रामीण भागातील दळणवळण सुधारण्यासाठी उपयुक्त ठरणारा प्रकल्प असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये त्याबाबत मोठी अपेक्षा आहे. मात्र, सध्या हा प्रकल्प प्रशासकीय मंजुरीच्या टप्प्यातच अडकून असल्याचे प्रकल्प पूर्ण होण्याची निश्चित कालावधी सांगता येणार नसल्याचे केंद्र सरकारच्या सरकारच्या लेखी उत्तरातून स्पष्ट झाले आहे.

# प्रादेशकि परविहन कार्यालयाकडून 428.87 कोटी रुपयांची महसूल वसुली

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** सन 2025–2026 या आर्थिक वर्षात प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकलूज यांनी महसूल वसुलीत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. परिवहन कार्यालयाकडून देण्यात आलेल्या 389.62 कोटी रुपयांच्या उद्दिष्टांच्या तुलनेत प्रत्यक्ष 428.87 कोटी रुपयांची महसूल वसुली करण्यात आली असून, हे उद्दिष्टाच्या 110 टक्के आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात वायुवेग पथकांमार्फत कठोर कारवाई करण्यात आली. हेल्मेट न वापरणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर, सीटबेल्टचा अभाव, विमा व पीयूसी नसलेली वाहने, योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण नसलेली वाहने, रिफ्लेक्टर टेल लॅम्प नसलेली वाहने, विना अनुज्ञप्ती वाहन चालविणे तसेच क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली. या अंतर्गत एकूण 27,175 चलान जारी करण्यात आले. या कारवाईतून 14 कोटी रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले असून, हे 19 कोटी रुपयांच्या उद्दिष्टाच्या 73.72 टक्के आहे.

वाहन नोंदणीच्या बाबतीतही दोन्ही कार्यालयांनी लक्षणीय प्रगती केली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे 87,128 नवीन वाहनांची नोंदणी झाली असून त्यातून 227 कोटी 6 लाख रुपयांचा कर ऑनलाईन प्राप्त झाला आहे.

तर उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकलूज येथे 41,750 वाहनांची नोंदणी होऊन 92 कोटी 22 लाख रुपयांचा कर प्राप्त झाला आहे.

ई–वाहनांच्या नोंदणीतही वाढ दिसून येत आहे. सोलापूर कार्यालयात 8,128 ईलेक्ट्रीक दुचाकी व 329 चारचाकी वाहनांची नोंदणी झाली असून, अकलूज येथे 90 दुचाकी व 1 चारचाकी ई–वाहनांची नोंद झाली आहे.

HSRP नंबर प्लेट बसविण्याच्या मोहिमेतही प्रगती झाली आहे. सोलापूर कार्यालयात 1 एप्रिल 2019 पूर्वी नोंदणी झालेल्या 9,26,839 वाहनांपैकी 2,60,546 वाहनांना HSRP नंबर प्लेट बसविण्यात आल्या आहेत. तर अकलूज कार्यालयात 1,98,122 वाहनांपैकी 82,078 वाहनांवर HSRP नंबर प्लेट बसविण्यात आल्या आहेत.

एकूणच, महसूल वसुली, नियमभंगावरील कारवाई, वाहन नोंदणी आणि ई–वाहन प्रोत्साहन या सर्व बाबींमध्ये प्रादेशिक परिवहन विभागाने उल्लेखनीय प्रगती साधली असून शासनाच्या उद्दिष्टपूर्तीस मोठा हातभार लावला आहे.

# मोहोळ मतदारसंघात भारनियमनाचा प्रश्न गंभीर–आ. राजू खरे



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):–** मोहोळ विधानसभा मतदारसंघात सध्या सुरू असलेल्या तीव्र भारनियमनाच्या समस्येच्या पार्श्वभूमीवर आमदार राजू खरे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत सविस्तर आढावा बैठक घेतली. सायंकाळी ६ ते रात्री १० या महत्त्वाच्या वेळेत वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिक तसेच शेतकरी बांधवांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब या बैठकीत अधोरेखित करण्यात आली.

बैठकीस अधीक्षक अभियंता माने, कार्यकारी अभियंता सूर्यवंशी, पंढरपूर विभागाचे कार्यकारी अभियंता शिंदे, तसेच उपअभियंते देवकर (कुरुल) आणि पटवेकर (मोहोळ) उपस्थित होते. यावेळी मतदारसंघातील विविध भागांमध्ये डीपी जळणे, वादळी वाऱ्यामुळे विद्युत खांब कोसळणे, विद्युत तारा तुटणे अशा तांत्रिक अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. विशेषतः नागरिकांच्या दैनंदिन गरजा आणि शेतकऱ्यांच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी सायंकाळी ६ ते रात्री १० या कालावधीत अखंडित वीज पुरवठा सुरू ठेवण्याच्या ठोस सूचना आमदार खरे यांनी दिल्या.

दरम्यान, मतदारसंघातील वीज समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे आमदार राजू खरे यांनी यावेळी सांगितले.

# छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी निमित्त अभिवादन व भव्य रक्तदान शिबिर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** श्री शिवजन्मोत्सव (मध्यवर्ती) महामंडळ संपर्क कार्यालय येथे श्री शिवजन्मोत्सव (मध्यवर्ती) महामंडळ ट्रस्ट, सोलापूर यांच्या वतीने तसेच छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय रक्तपेढी, सोलापूर यांच्या सहकार्याने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन महापौर श्री विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महापौरांच्या हस्ते रक्तदान केलेल्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. आपल्या मनोगतात महापौर श्री विनायक कोंड्याल यांनी सांगितले की, उन्हाळा सुरू झाल्यामुळे रक्ताचा तुटवडा जाणवत आहे, अशा परिस्थितीत श्री शिवजन्मोत्सव (मध्यवर्ती) महामंडळ ट्रस्ट यांनी आयोजित केलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून समाजासाठी उपयुक्त आहे.

अशा सामाजिक उपक्रमांमुळे अनेकांना जीवनदान मिळते, असेही त्यांनी नमूद करत आयोजकांचे आभार मानले.

या प्रसंगी सभागृह नेते नरेंद्र काळे,ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर नाना काळे, राजन जाधव ,माजी आमदार रविकांत पाटील मध्यवर्ती उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर , नगरसेवक मनीष केत,बजरंग जाधव , गणेश शेळके, नामदेव पवार, विजय पुकाळे, नाना भोईटे, उत्तरा बरडे, उज्वला साळुंखे , विजय चव्हाण , लता ढेरे , अंबादास शेळके ,शिवाजी वाघमोडे, श्रीकांत डांगे हरीभाऊ सुरवसे, नागेश वडणे , प्रकाश ननवरे ,वैभव गंगणे,महेश हनमे, भैय्या ताकभाते, सचिन स्वामी, देविदास घुले, शंतनू साळुंखे, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'नगरपरिषद अभियंत्यांवर अन्याय; सेवाश्रेणी सुधारणेची मागणी'





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** महाराष्ट्रातील नगरपरिषदांमध्ये कार्यरत असलेल्या अभियंता संवर्गावर मा. उच्च न्यायालयाने शासनास निर्णय घेनेचे आदेश देऊनही दीर्घकाळापासून अन्याय होत असल्याची खंत व्यक्त करत महाराष्ट्र राज्य नगरपरिषद अभियंता संघटनेने शासनाकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. नगरपरिषद अभियांत्रिकी संवगार्चे सेवाप्रवेश नियम, पदनामे व वेतनश्रेणी नगरविकास विभागांतर्गत इतर विभागांप्रमाणे सुधारित कराव्यात तसेच संवर्गाची कुंठितता दूर करून भारतीय राज्यघटनेनुसार समान संधी व न्याय द्यावा अशी मागणी संघटनेने केली आहे.

संघटनेचे अध्यक्ष संजय कुंभार व उपाध्यक्ष विकास म्हमाणे यांच्या स्वाक्षरीने नगरविकास राज्यमंत्री यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सामान्य प्रशासन विभागाच्या ९ सप्टेंबर २०२१ च्या शासन निर्णयामधील आदर्श नमुन्यानुसार नगरपरिषद अभियांत्रिकी संवगार्चे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आलेले नाहीत. तसेच नगरविकास विभागाने १४ ऑगस्ट १९९० रोजी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार पदसोपान निश्चित केलेले नसल्यामुळे अभियंता संवर्गावर मोठ्या प्रमाणात अन्याय होत असल्याचा खंत व्यक्त करण्यात आलीआहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, राज्यातील नगरपरिषदांमध्ये कामाच्या गरजेनुसार कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि ओव्हरसियर अशी पदरचना असावी, असे पूर्वीच निश्चित करण्यात आले होते. मात्र २००६ मध्ये राज्यस्तरीय समान संवर्ग तयार करताना या तत्वांचे पालन करण्यात आले नाही. त्याऐवजी गट–क श्रेणीतील पदरचना करून अभियंता संवर्गाची प्रगती खुंटवण्यात आली, अशी संघटनेने खंत व्यक्त केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, समावेशन प्रक्रियेनंतर अनेक अभियंत्यांची जेष्ठता लक्षात न घेता थेट भरती करण्यात आली. त्यामुळे २० ते २५ वर्षे सेवा केलेले अभियंते कनिष्ठ पदावरच राहिले, तर नव्याने नियुक्त झालेल्या अभियंत्यांना वरिष्ठ पदे मिळाली. याशिवाय २०१८ पासून संवर्गातील निवडश्रेणीची पदे रद्द केल्यामुळे पदोन्नतीच्या संधीही मोठ्या प्रमाणात कमी झाल्या आहेत. तसेच संवर्ग तयार झाल्यापासून दरवर्षी पदोन्नतीचे आदेश निघणे असताना मागील सतरा वर्षात फक्त तीन वेळा पदोन्नतीचे आदेश देण्यात आलेले आहेत.

संघटनेने आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित करत नगरपरिषदांमधील नगररचना व विकास सेवा संवर्गातील पदे १०० टक्के प्रतिनियुक्तीने भरण्याचा १३ एप्रिल २०१७ चा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या धोरणाविरोधात असल्याचा दावा केला आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या नियमांनुसार मूळ मंजूर संवगार्तील केवळ १५ टक्क्यांपर्यंतच प्रतिनियुक्ती करता येते. त्यामुळे हा निर्णय रद्द करावा आणि नगरपरिषद अभियंत्यांना पदोन्नतीची संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या बळकटीकरणासाठी मुख्यालय, विभागीय व जिल्हा स्तरावर कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता अशी पदे निर्माण करून त्या पदांवर सार्वजनिक बांधकाम विभागा मधील अभियंत्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आलेली आहे तीही शासन सामान्य प्रशासन विभागाचे १३ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयाच्या धोरणाविरुद्ध असल्याचे संघटनेचा दावा आहे. बाहेरील विभागातून प्रतिनियुक्तीने येणाऱ्या अधिकाऱ्यांना नगरपरिषद प्रशासनाची कार्यपद्धती माहित नसल्याने प्रशासनाच्या बळकटीकरणाचा उद्देश साध्य होत नसल्याचेही संघटनेचे म्हणणे आहे.त्यामुळे या पदावर नगरपरिषद अभियंत्यांना पदोन्नती दिली जावी अशीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, मुख्याधिकारी संवर्गाच्या बाबतीत शासनाने पदोन्नतीच्या संधी वाढविण्यासाठी वेळोवेळी विविध निर्णय घेतले असताना नगरपरिषद अभियंता संवर्गाकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याची खंतही निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. मुख्याधिकारी संघटनेचे पदंनेचे आधार वर्षी वेळोवेळी काढले जातात.

भारतीय राज्यघटनेतील समानता आणि समान संधीच्या तत्वांचे पालन करून महाराष्ट्र नगरपरिषद अभियंता संवर्ग,नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे बळकटीकरण पदे व नगरपरिषद स्तरावरील नगर रचना पदे या तीन पदांचे एकत्रीकरण करून एकच समान व सक्षम नगरपरिषद प्रशासन संचलनायाचा कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता असा सक्षम सवर्ग तयार करावा व नगरपरिषदांचे व नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे खरोखर बळकटीकरण करुन नगरपरिषद अभियंत्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध करुन देऊन अभियंता संवगार्ची आत्तापर्यंत झालेली कुंठितता दुर करावी प्रशासनाने प्रशासकीय सुधारण्यासाठी जाहीर केलेला दीडशे दिवसाचा कार्यक्रम व सेवा कर्मी कार्यक्रम सफल करावा अशी मागणी संघटनेने केली आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनाही निवेदनाची प्रत पाठवण्यात आली असून नगरपरिषद अभियंत्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# नानेपुते येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवास प्रारंभ

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):–** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्यांनी समाज उद्धारासाठी, अन्यायाविरुद्ध आसूड उगारण्यासाठी बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत यासारखी मुखपत्र चालवली. या मुखपत्राचे त्यांनी संपादक म्हणून काम पाहिले त्याचे स्मरण म्हणून दि. १ एप्रिल रोजी नातेपुते येथे पत्रकार बांधवांचा सन्मान करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवाच्या कार्यक्रमाला प्रारंभकरण्यात आला. या कार्यक्रमाचे उदघाटक पत्रकार समीर सोरटे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष संघर्ष सोरटे हे होते. दि. १ एप्रिल ते १४ एप्रिल काळात जयंती महोत्सव समितीतर्फे वैचारिक सामाजिक आणि बौद्धिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये दि. १ एप्रिल पत्रकार बांधवांचा सन्मान, दि. २ एप्रिल प्रश्नमंजुषा, दि. ३ एप्रिल माझा करिअर कट्टा, दि. ४ एप्रिल जयभिम वाला नवरा हा मनोरंजनात्मक कार्यक्रम, दि. ५ एप्रिल भीमकन्या कडुबाई खरात – यांचा भीमगीतांचा कार्यक्रम, दि. ६ एप्रिल जयभिम पँथर हा चित्रपट प्रदर्शन, दि. ७ एप्रिल भव्य रक्तदान शिबीर, दि. ८ एप्रिल गायक विजय सरतापे यांचा भीमगीतांचा कार्यक्रम, दि. ९ एप्रिल गायक साजन बेंद्रे व विशाल चव्हाण यांचा भीमगीतांचा कार्यक्रम पार पडणार आहे. तसेच दि. १० एप्रिल सर्वरोग निदान शिबीर, मोफत पाईल्स – तपासणी शिबीर, दि. ११ एप्रिल क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सभा व सायंकाळी सुप्रसिद्ध वक्ते सुकुमार कांबळे सांगली यांचे दि. १२एप्रिल व्याख्यान, महिलांसाठी होम मिनिस्टर हा कार्यक्रम, दि. १३ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याचा देखावा व भीम जल्लोष हा कार्यक्रम तसेच – मध्यरात्री १२ वाजता अभिवादन व बुध्दवंदना, दि. १४ एप्रिल सकाळी समता रॅली व अभिवादन सभा तसेच सायंकाळी जयंती निमित्त भव्य मिरवणूक आयोजित करण्यात आल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे.

# सर्व अधिकारी– कर्मचाऱ्यांनी 'कर्मयोगी' प्रशिक्षण पूर्ण करावे– वीणा पवार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** राज्य शासनाच्या महा साधना सप्ताह या उपक्रमांतर्गत सर्व अधिकारी कर्मचारी यांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या उपक्रमात सोलापूर महानगरपालिका सर्व अधिकारी–कर्मचारी यांनी सहभागी व्हावे व प्रशिक्षण पूर्ण करावे, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी केले. भारत सरकार क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २ ते ८ या दरम्यान 'साधना सप्ताह' राबविण्यात येणार आहे. अधिकारी कर्मचारी यांना | Got कर्मयोगी या प्लॅटफॉर्मवर किमान ४ तासाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात आज एका प्रशिक्षण कार्यशाळेद्वारे करण्यात आली. 2 एप्रिल रोजी दुपारी 3 वाजता इंद्रभुवन इमारतीत मीटिंग हॉल सभागृहात हे प्रशिक्षण पार पडले. या कार्यशाळेस उपायुक्त सोनाली यादव, सहायक आयुक्त मनिषा मगर, सहायक आयुक्त गिरीश पंडित, सर्व विभागप्रमुख, विभागीय अधिकारी, कार्यालयप्रमुख तसेच कर्मचारी सहभागी झाले होते.

संगणक विभाग प्रमुख स्नेहल चपळगावकर यांनी महा साधना सप्ताह, तसेच i-Got प्रणाली नोंदणी व पूर्ण करावयाचे अभ्यासक्रम याविषयी तांत्रिक मार्गदर्शन केले.

राज्य शासनाने हा उपक्रम 'महासाधना' उपक्रम म्हणून राबविण्याचे ठरविले आहे. शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना बदलत्या काळातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी हा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक बनविण्याचा प्रयत्न होत आहे. या उपक्रमांतर्गत विविध सादरीकरणे, मार्गदर्शन सत्रे आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. यामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, ई–गव्हर्नन्स प्रणाली, प्रभावी संवाद कौशल्य, तसेच कार्यालयीन कामकाजातील कार्यक्षमता वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर अधिकारी व कर्मचाऱ्यांना अद्ययावत ज्ञान व कौशल्ये आत्मसात करता यावीत, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. हे सर्व अधिकारी कर्मचारी या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होतील. प्रशासनातील कामकाज अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक करण्यासाठी या प्रशिक्षणाचा उपयोग होणार आहे. तसेच नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठीही हा उपक्रम उपयुक्त ठरेल, असे मत अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी व्यक्त केले. अधिकारी कर्मचाऱ्यांना आधुनिक प्रशिक्षणाने अद्यावत करणाऱ्या या उपक्रमात सर्व अधिकारी कर्मचारी यांनी सहभागी होऊन नेमून दिलेल्या कालावधीत प्रशिक्षण पूर्ण करावे, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी दिले.

# शिवसेनेतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवसेना सोलापूर शहर–जिल्हाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसैनिकांनी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख , उपजिल्हाप्रमुख अक्षय बिद्री, संजय सरवदे, तालुकाप्रमुख राजकुमार शिंदे, उपशहरप्रमुख अयुब पठाण, कुणाल दिक्षित, अमोल कदम, समीर मुजावर, अमीर मुजावर, शिवकांत शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी शिवाजी महाराजांच्या कायार्चा आदर्श समोर ठेवून समाजकार्य व राष्ट्रहितासाठी कार्यरत राहण्याचा संकल्प केला.

# जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते अमृता पुजारी यांचा सत्कार



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते चौथ्या महिला महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा मान मिळवणाऱ्या अमृता पुजारी कोल्हापूर यांचा सत्कार छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा कृपावस्त्र देऊन सोलापूर येथे करण्यात आला.

बोरामणी चे सुपुत्र पै. स्व. सिद्धेश्वर साखरे यांच्या स्मरणार्थ चौथ्या महिला महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत डबल महाराष्ट्र केसरी कुस्त्या स्पर्धा नुकत्याच सोलापूर येथील हरीभाई देवकरण प्रशाला सोलापूर येथे संपन्न झाल्या.

या प्रसंगी चौथ्या महिला महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा मान मिळवणाऱ्या अमृता पुजारी कोल्हापूर चा सत्कार श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा कृपावस्त्र देऊन सोलापूर येथे करण्यात आला. याप्रसंगी संयोजक स्वाती साखरे–अळ्ळीमोरे, सागर कत्ते, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, खजिनदार लाला राठोड, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, शिरीष कुलकर्णी, जयंतराव सुभेदार, रमेश केत, पै. भरत मेकाले, पै. बजरंग मेकाले, पै.अप्पा साखरे, पै. उमेश सुळ, पै. मुन्नालाल शेख, पै. मौलाली शेख, सर्फराज शेख, महांतेश स्वामी, समर्थ चव्हाण यांच्या सह बहुसंख्येने कुस्तीगीर उपस्थित होते.

# नीरा देवघर सिंचन प्रकल्प रखडला; PIB बैठकीला अद्याप नवी तारीख नाही



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** माढा लोकसभा मतदारसंघातील महत्त्वाच्या नीरा देवघर सिंचन प्रकल्पाबाबत खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी लोकसभेत लेखी प्रश्न उपस्थित करत केंद्र सरकारचे लक्ष वेधले.

खासदार मोहिते पाटील यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नांमध्ये महाराष्ट्रातील नीरा देवघर सिंचन प्रकल्पास आर्थिक मान्यता देण्यासाठी सार्वजनिक गुंतवणूक मंडळ (PIB) कडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता काय?

तसेच या प्रस्तावाच्या परीक्षणासाठी PIB ची बैठक निश्चित करण्यात आली होती काय? असल्यास, त्याचा तपशील काय आहे आणि संबंधित मंत्रालयाच्या विनंतीवरून ही बैठक पुढे ढकलण्याची कारणे काय होती? सदर PIB बैठकीसाठी नवीन तारीख निश्चित करण्यात आली आहे काय? तसेच या संदर्भात कोणताही पाठपुरावा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय?

त्याचबरोबर विशेषतः माढा लोकसभा मतदारसंघातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना वेळेवर सिंचन सुविधा मिळाव्यात यासाठी निरा देवघर सिंचन प्रकल्पास मान्यता मिळवून देण्याकरिता मंत्रालयाकडून कोणती ठोस पावले उचलण्यात येत आहेत?

यावर केंद्र सरकारच्या वतीने उत्तर देताना केंद्रीय जल शक्ती राज्यमंत्री राज भूषण चौधरी यांनी लेखी उत्तर दिले की, नीरा देवघर सिंचन प्रकल्पाचा सुमारे ३,५९१.४६ कोटी खर्चाचा प्रस्ताव PMKSY-AIBP योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यासाठी सार्वजनिक गुंतवणूक मंडळाकडे पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावाच्या परीक्षणासाठी ७ जून २०२४ रोजी PIB बैठक निश्चित करण्यात आली होती. मात्र ही बैठक पुढे ढकलण्यात आली असून, अद्याप नवीन तारीख निश्चित करण्यात आलेली नाही. तसेच या प्रकल्पाच्या संदर्भात पुढील प्रक्रिया PIB च्या मूल्यांकन व शिफारशींनंतरच होणार असल्याचेही सरकारने लेखी उत्तर देत स्पष्ट केले. केंद्र सरकारच्या या उत्तरामुळे निरा देवघर सिंचन प्रकल्पाची मंजुरी अद्याप प्रलंबित असल्याचे स्पष्ट झाले असून, माढा मतदारसंघातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सिंचन सुविधेसाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे चित्र आहे.